# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

March 2020 Special Issues- 25 Vol. 2

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Chief Editor**
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

**Editor**
Dr. R. K. Kale

**Co-Editors**
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

57. महिला सबलीकरण आणि भारतीय धोरण 215
डॉ. खेत्री कुंडलिक रघुनाथ,
58. जम्मु काश्मिर , कलम ३७० आणि ३५८(अ) 218
लखन बाळु कुंभारे
59. "वस्तू व सेवा कर; भारतीय नवआर्थिक युगाची पहाट" 221
लखन देविचंद सुर्यवंशी
60. महिला सशक्तिकरण व भारत सरकारचे धोरण 226
लव्हाळे दत्ताराम नारायण
61. नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९ 229
प्रा.डॉ.बी.बी.लोंखडे
62. ''भारतीय संयुक्त कुटूंब पध्दतीचा ऱ्हास'' 234
प्रा.डॉ. माया बापूराव मसराम
63. दहशतवाद 238
प्रा. मच्छिंद्रनाथ मारुती सुर्यवंशी
64. नक्षलवाद : भारतातील एक समस्या" 241
माधव चांदु वाघमारे
65. भारतीय संसदीय लोकशाही आणि आघाड्यांचे राजकारण 244
प्रा.डॉ. माधव चोले
66. भारतीय संविधान आणि लोकशाही मुल्ये 248
प्रा.मगरे.एम.के.
67. भारतीय समाजातील वाढती बेकारी (Unemployment Growth in IndianSociety) 251
प्रा.डॉ. बी.एल. म्हस्के
68. दहशतवाद : भारतासमोरील एक आव्हान 253
माने परमेश्वर मुक्तीराम
69. वस्तु व सेवांच्या संदर्भात भारताच्या विदेशी व्यापाराची रचना 255
डॉ. वैशाली ल. देशमुख
70. भारतातील बेकारी : कारणे आणि उपाय 259
प्रा. आचार्य बालाजी वैजनाथ
71. दहशतवादाचे बदलते स्वरूप 262
आकाष शेषराव बांगर
72. जातिवाद ( casteism ) 265
डॉ. आर. के. काळे, मोरे संजय दिनकर
73. महिला सबलीकरणामध्ये शासकीय योजनांचे योगदान 270
श्री. अंबुरे ऋषिकेश सर्जेराव
74. भारतीय शेतकरी चळवळ 273
अनिल मारोतराव जाधव
75. "भारतातील वाढत्या बेरेजगारीची कारणे व त्यावर सरकारने केलेल्या उपाययोजना" 275
अर्चना विश्वनाथराव आरमाळकर

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 25 , Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महिला सबलीकरण आणि भारतीय धोरण

**डॉ. खेत्री कुंडलिक रघुनाथ**
बलभीम महाविद्यालय, बीड.

---

**गोषवारा:**

भारतीय समाजात राज्य, धर्म, शिक्षण, अर्थ, कला, साहित्य आणि संस्कृती याद्वारे महिलांचे सामाजिकरण केले जाते. यामुळे ती कमकुवत असल्याचे दिसुन येते. भारतीय समाजाचा विकास करण्यासाठी महिलासबलीकरण होणे गरजेचे आहे.

**की वर्ल्ड :** महिला सबलीकरण**,** संविधानात्मक कायदे**,** सामाजिकरणाची प्रक्रिया**,** आर्थिक स्वावलंबन.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. तसाच तो पुरूष प्रधान समाजव्यवस्था असणारा देश आहे. भारतीय कुटुंब व्यवस्थेत कुटुंब प्रमूखाचा दर्जा हा पुरूषाकडे असल्याचे दिसून येते. कोणताही निर्णय हा पुरूष घेत असतांना दिसून येतो. यातून भारतीय महिलांचा दर्जा निम्न असल्याचे स्पष्ट होते. स्त्री ही कुटुंबाचा कणा असली तरी तीला अनेक बंधने घातलेली दिसतात. महिलांना राज्य धर्म शिक्षण, अर्थ, कला, साहित्य आणि संस्कृती या सर्व घटकांची बंधने दिसून येतात. स्त्री हि निसर्गातच कमकुवत असते. तर वरील बंधनातून तीचे सामाजिकरण केले जाते. यामुळे ती आणखी कमकूवत बनत जाते. तीला लहानपणी आई-वडील, मोठ्यापणी पती आणि वृद्ध काळात मुले यांचा सहारा घ्यावा लागतो. भारतीय स्वातंत्र्यानंतर महिलांना संविधानाने राज्यघटनेत अनेक अधिकार देण्यात आले पण ते कायदे फक्त कायदेच राहिले तर त्याचा लाभ खुपच कमी महिलांना झाल्याचा दिसून येतो. भारतीय समाजव्यवस्थेत महिलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले. भारतीय समाजातील महिलांचे सबलीकरण करण्यासाठी त्यांना कुटुंबात समान संधी देणे आवश्यक आहे.

राज्य, धर्म,शिक्षण, अर्थ, कला साहित्य आणि संस्कृती चा सर्व घटकात जोपर्यंत महिलांना समान संधी दिली जाणार नाही तोपर्यंत महिला सबलीकरण होणार नाही.

**महिला सबलीकरण:**

"स्त्री सबलीकरण स्त्रला सबल करणारी तसेच दुर्बलता नष्ट करणारी तिचे शरीर, मन, बुद्धी, स्वताची जाणीव, स्वतः बद्दल जागरूकता, स्वयंविकासासाठी प्रवृत्त करणारी एक संकल्पना आहे."

"सबलीकरण म्हणजे बळजबरीने दुर्बल ठेवण्याच्या अवस्थेकडून शक्तीकडील वाटचाल होय."

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत शोध निबंधासाठी दुय्यम सामुग्रीच्या आधारावर तथ्य संकलन केले आहे. विश्लेषणात्मक पद्धतीने या विषयाची मांडणी केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) महिला सबलीकरणाची संकल्पना स्पष्ट करणे.

२) महिला सबलीकरणासाठी असणाऱ्या कायद्यांचा अभ्यास करणे.

३) महिला सबलीकरणावर उपाय सुचवणे.

**महिला सबलीकरणाचे धोरण आणि उपाय:**

**१) संविधानात्मक धोरण :**

भारतीय राज्यघटनेने तिच्या प्रास्ताविकेत सर्व भारतीयांना दर्जा आणि संधीची समानता देण्याचे अभिवचन दिलेले आहे. राज्यघटनेतील कलम १४ ते १८ अंतर्गत सर्वांना समानतेचा हक्क दिलेला आहे. कलम १४ नुसार कायद्यामुळे सर्वांना समान मानण्यात आले आहे. तर कलम १५ नुसार राज्य नागरिकांमधे लिंगाच्या (धर्म, वंश व जात) आधरे भेदभाव करण्यात येणार नाही अशी तरतुद आहे. कलम १९ नुसार पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही व्यवसाय निवडीचे स्वतंत्र्य दिले आहे. कलम ४५ नुसार १४ वर्षापर्यंतच्या सर्व मुलांना व मुली नाही मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतुद केली आहे.